## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.११/०५/२०१८

## दि.१०/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ९२/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | अक्षय घाग,वय-२० वर्षे,रा.वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | नवनाथ आंण्णा पाटील,वय-२८ वर्षे,रा.तोफखाना,कामगार पुतळा,शिवाजीनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०५/२०१८ रोजी २३/३० वा. वसंत टॉकीज बस स्टॉप समोर, शिवाजी रोडवर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,यातील नमुद इसम नवनाथ पाटील याने फिर्यादी यांना खाली पाडुन त्यांचे खिशातील मोबाईल फोन जबरदस्तीने चोरी करुन नेला. सदर इसमाचा फिर्यादी यांचेसमवेत शोध घेत असताना,तापकीर गल्ली,४७९,कसबा पेठ,क्षिरसागर वाडा,पुणे येथे नवनाथ पाटील यास पोलीस चौकी येथे आणुन त्याची अंगझडती घेता त्याचेकडुन गुन्हयातील चोरीचा ऐवज मिळुन आला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.पी.भोपळे ७९७२१२११९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २३९/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४५,रा.तळेगाव-दाभाडे,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०५/२०१८ रोजी १७/०० वा. लक्ष्मीदिप सोसायटी समोर रानजाई हॉटेलचे पुढे सर्व्हिस रोडवर वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसह मोटार सायकलवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र १,१०,०००/- रू किचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अरूण वायकर ९९२३४९८५८७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ४२०/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | श्रीमती.तुळसा आडेप,वय-७०,रा.भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०५/२०१८ रोजी दु.१२/३० वा. किराड हॉस्पीटल नाना पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया भाजी खरेदी करून नमुद ठिकाणाहुन पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस एका इसमास १२ वर्षाने मुलगा झाला आहे,तो साडी वाटप करीत आहे असे सांगुन,फिर्यादी यांचे अंगावरील सोन्याचे दागिने व रोख २०० रूपये असा एकुण ५०,२००/- रू किचा ऐवज दागिन्याचे पिशवी मध्ये बिस्कीटचे पुडे ठेवण्याचा बहाणा करून फिर्यादी यांची दिशाभुल करून सदरचे दागिने फसवणुक करून घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.जाधव ८८०५०२३१९३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २११/१८,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४०,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात पाच इसम व एक महिला मोबाईल व ई-मेल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१०/२०१७ ते दि.१०/०२/२०१८ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी धायरी,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात पाच इसम व एक महिला मोबाईल व ई-मेल धारक यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे पत्नीस कॅली ॲलेक्स नावाच्या व्यक्तीने फ्रेन्डशिप करुन त्यांना इंग्लंड मधुन गिफ्ट पाठविले आहे. सदर गिफ्ट मध्ये ३२ लाख पौंड चलना मध्ये आले आहे असे सांगुन,फिर्यादी यांचे पत्नीस रजिस्ट्रेशन चार्जेस दंड म्हणुन भारतीय चलनात कन्वर्ट करण्यासाठी टॅक्स व दंड म्हणुन ६,४८,०००/- रुपये भरणेस भाग पाडुन,फिर्यादी यांचे पत्नीस कोणतेही गिफ्ट न देता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) बबन खोदडे ९९२३७९५८४६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १४६/१८,भादविक ४०६,४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१,४७२,३४ |
| **फिर्यादी** | संजय गायकवाड,वय-५५ वर्षे,रा.खडकी,पुणे |
| **आरोपी** | १.दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्रं.८,मधील अधिकारी व कर्मचारी २.लोहगाव गावकामगार तलाठी व इतर दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | अंदाजे सन २०१७ ते मार्च २०१८ या कालावधी मध्ये लोहगाव सर्वे नं.२३०ब/१/१/१ या जागेबाबत दुय्यम निबंधक कार्यालय,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुभाष बने व शाम गवस यांनी दुय्यम निबंधक कार्यालय,हवेली क्रं.८ मधील अधिकारी व कर्मचारी तसेच लोहगाव गावकामगार तलाठी यांचेशी संगनमत करुन लोहगाव लोहगाव सर्वे नं.२३०ब/१/१/१ या जागेचे खरेदीदस्त नं.१६४३/१९९२ यासाठी बनावट शिक्के तयार करुन बनावट / खोटया सहीच्या आधारे खोटा खरेदीदस्त बनविला. तसेच सदर बनावट दस्ताचे आधारे दि.०९/०१/२०१८ रोजी फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांची दिशाभुल करुन त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचे आप-आपसामधील कुलमुखत्यारपत्र फिर्यादी यांचे नातेवाईक हे फिर्यादी यांचे नावे करणार असताना,तसे शाम गवस यांनी न करता कुलमुखत्यार दस्त क्रं.२०१/२०१८ हा दुय्यम निबंधक कार्यालय,हवेली क्रं.८ यांचे कार्यालयात दि.०९/०१/२०१८ रोजी नोंदविला असल्याचे फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांना सांगुन त्या दस्ताची मुळ प्रत फिर्यादी यांना न देता त्याची छायाकींत प्रत फिर्यादीस देऊन,सदरचा दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात न नोंदविता,सदर दस्तामधील फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांनी सहया केलेल्या व फोटो चिकटविलेल्या तसेच अंगठे मारलेल्या पानांचा वापर दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्रं.८ येथे सुभाष बने याने नोंदविलेल्या दस्त क्रं.२१२/२०१८ चे समंती पत्रास लाऊन दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्रं.८ यांचे कार्यालयात संमतीपत्राचा दस्त क्रमांक रजिस्टर करुन,नमुद खोटया खरेदी खत्याचे व संमतीपत्राचे आधारे सुभाष बने याने ७/१२ चे उता-यावर नांव नोंदवुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांची जमीन बळकाविण्याचे उद्देशाने विश्वासघात करुन फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विलास सोंडे ८८८८७१२७३६ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४२१/१८,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | चंद्रकांत लोखंडे,वय-६५ वर्ष,रा.थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/३० वा. एकता कॉलनी,गणेशनगर,थे्रगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची मारूती वॅगन कार नं.एमएच/१४/इसी/८४२० ही स्वतःचे पार्किंग मध्ये पार्क करून ठेवली असताना,नमुद वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे कारवर ज्वलनशील पदार्थ टाकुन ती जाळुन कारचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. आर.जी. टिळेकर ९७६४८८५४३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**